जा.नं.एसएसएस/वशी-अ.क/ ४४३७ /२०२६

दिनांकः- 11 FEB 2026

रजि. ए.डी.

**प्रति,**

**न्याती एन्टरप्राईजेस**

**द्वारा, दिपा अतुल न्याती, रामदेव बंगला,**

**निवारा हाऊसिंग सोसायटी, संजीवनी हॉस्पीटलजवळ,**

**मु.पो.ता. श्रीरामपुर जिल्हा. अहिल्यानगर. पिन. ४१३७०९.**

**मो.नं. ९५२९९०७८०६**

**विषयः- रिकामे तेला-तुपाचे लहान/मोठे तोंडाचे चांगले डबे साहित्य न उचललेबाबत.**

संदर्भः- १. जा.नं.एसएसएस/वशी-अ.क./६१९/२०२५ दि.१२/०५/२०२५ रोजीचा कार्यादेश

२. जा.नं.एसएसएस/वशी-अ.क./१२०६/२०२५ दि.१६/०६/२०२५ रिकामे तेला-तुपाचे डबे उचलनेबाबत पत्र

३.जा.नं.एसएसएस/वशी-अ.क../१९९५/२०२५ दि.०७/०८/२०२५ रिकामे तेला-तूपाचे डबे उचलनेबाबत पत्र.

४. जा.नं.एसएसएस/वशी-अ.क./३१७७/२०२५ दि.०६/११/२०२५ रिकामे तेला-तूपाचे डबे उचलनेबाबत पत्र.

५. जा.नं.एसएसएस/वशी-अ.क./३८३४/२०२५ दि.२५/१२/२०२५ रिकामे तेला-तूपाचे डबे उचलनेबाबत पत्र.

६. जा.नं.एसएसएस/वशी-अ.क./४१६३/२०२६ दि. २१/०१/२०२६ रोजीची नोटीस.

श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी यांचेकडील निरूपयोगी भंगार साहित्य खरेदी करणेकामी, सन २०२५-२६ या वर्षाकरिता आपण ई-निविदा भरलेली आहे. सन २०२५-२६ या वर्षाकरिता आपणांस संस्थानकडील विविध विभागांकडील रिकामे तेला-तुपाचे लहान/मोठे तोंडाचे चांगले डबे साहित्य विक्रीकरिता दर मंजूर करण्यात आलेले आहेत. तसेच जा. नं. एसएसएस/वशी-अ.क./६१९/२०२५ दि.१२/०५/२०२५ रोजी कार्यादेश देण्यात आलेला आहे.

तथापि, आपण तेला/तुपाचे चांगले डबे दि. ०८ ऑक्टोंबर, २०२५ नंतर आज अखेरपर्यंत उचलेलेले नाही. याबाबत संदर्भिय पत्रांद्वारे तसेच विभागांचे संबंधित प्रतिनिधींनी आपणांस डबे उचलणेबाबत वारंवार कळविण्यात आलेले आहे. त्याबाबत आपण अद्यापही खुलासा दिलेला नाही. संस्थानकडील विविध विभागांकडील रिकामे तेला-तुपाचे लहान/मोठे तोंडाचे चांगले डबे मोठया प्रमाणात साठलेले असून, सदर डबे न उचलल्यामुळे या विभागांकडे डबे साठवणूक क्षमता नाही व त्यामुळे सदर परिसर अस्वच्छ दिसत आहे.

संस्थानमार्फत आपणांस उपरोक्त संदर्भ ०६ अन्वये नोटीस देण्यात आलेली आहे त्यासही आजपावेतो आपण कुठलाच प्रतिसाद दिलेला नाही

तरी, सन-२०२५-२६ करिता आपणांस मंजूर असलेले रिकामे तेला-तुपाचे लहान/मोठे तोंडाचे चांगले डबे वेळोवेळी कळवूनही उचलत नसल्याने, आपणांस देण्यात आलेल्या कार्यादेशातील अट क्र. ०४ चा व करारनाम्यातील अट क्र. ०६ मध्ये नमुद केलेल्या अटींचा भंग झाल्याने, आपला कार्यादेश रद्द होऊन, आपली संस्थानकडे जमा असलेली अनामत रक्कम रू. ५०,०००/- (अक्षरी रू. पन्नास हजार) मात्र जप्त करून संस्थान खाती जमा करून घेण्यात आलेली आहे. तसेच आपले फर्मचे नांव पुढील ०३ वर्षांकरीता संस्थानचे काळ्या (Black list) यादीत समाविष्ट करण्यात आलेले आहे. याची नोंद घ्यावी.

Digitally signed by
Goraksha Mahadeo Gadilkar
Date: 10-02-2026 17:46:59

गोरक्ष गाडीलकर (भा.प्र.से.)
मुख्य कार्यकारी अधिकारी
श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,शिर्डी.